स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखेतील मराठी विषयातील पीएच.डी. पदवीकरिता
सादर करावयाचा शोध प्रबंधाचा संकल्पित

संशोधन आराखडा

संशोधन विषय

‘मराठवाड्यातील ग्रामीण कथेचा अभ्यास’

(भास्कर चंदनशिव आणि आसाराम लोमटे यांच्या विशेष संदर्भात)

संशोधक

आयोध्या आश्रुबा काटे

मार्गदर्शक

प्रा.डॉ. विश्वाधार रामराव देशमुख

मराठी विभाग,

यशवंत महाविद्यालय, नांदेड

२०२३

‘मराठवाड्यातील ग्रामीण कथेचा अभ्यास’

(भास्कर चंदनशिव आणि आसाराम लोमटे यांच्या विशेष संदर्भात)

प्रस्तावना :

स्वातंत्र्योत्तर काळात खेडोपाडी शिक्षणाचा प्रसार झाला. परिणामी साठोत्तरी काळात दलित, ग्रामीण, स्त्रीवादी व आदिवासी या वाङ्‌मयीन प्रवाहांचा उदय झाला. नवीन प्रवाहांच्या उदयाबरोबर मराठी साहित्य आशय, विषय, भाषाशैली, जाणिवा, आकृतिबंध आणि एकूणच जीवन चित्रणाच्या दृष्टीने अंतर्बाह्य बदलले. उपेक्षित समाजघटकांचे जीवन साठपूर्व साहित्यात अपवादानेच आले होते. याउलट उपेक्षितांची परवड चित्रित करणे हा साठोत्तर वाङ्‌मयीन प्रवाहाचा स्थायीभाव होता. पिढ्यानपिढ्यांचे दास्यत्व दलित साहित्याने मुखर केले. तर स्त्रीवादी साहित्याने स्त्रियांच्या दुय्यमत्वावर भाष्य केले. आदिवासी साहित्याने आदिवासींच्या दुःखाला वाट मोकळी करून दिली. तर ग्रामीण साहित्य प्रवाहाने आस्मानी आणि सुलतानी संकटांनी उद्‌ध्वस्त झालेला गावगाडा उभा केला. एकूणच साठोत्तरी कालखंडात उदयास आलेल्या वाङ्‌मयीन प्रवाहांनी मराठी साहित्याच्या कक्षा विस्तृत केल्या आहेत.

साठोत्तर काळातील वाङ्‌मयीन प्रवाहांपैकी ग्रामीण साहित्य प्रवाहाने एकूणच मराठी साहित्य समृद्ध केले. आस्मानी आणि सुलतानी संकटात सापडलेला शेतकरी, व्यापारी व अधिका-यांकडून त्याचे होणारे शोषण, शेतमालाला मिळणारा कवडीमोल भाव, शेतमालाला मिळणा-या भावातील चढउताराने आयुष्यात आलेली अस्वस्थता, बदलत्या राजकारणा बरोबर बदलत जाणारे नातेसंबंध, गुरा-ढोरांच्या गोतवळ्याशी शेतक-यांचे जुळलेले भावबंध, शेतमजूर-बलुतेदार-आलुतेदार व स्त्रियांचे भावविश्व, खेड्यातील निसर्ग आणि एकूणच गावगाड्याचे तेथील सुष्ट-दुष्ट व्यक्तिरेखांसह चित्रण ग्रामीण साहित्यात येऊ लागले.

साठपूर्वकाळात ग्रामीण साहित्य लेखनाला सुरूवात झाली असली तरी साठोत्तरी काळातील ग्रामीण कथा, कविता, कादंबरी व नाट्यलेखनातून ग्रामीण जीवनाचे व्यापक

चित्रण आले आहे. आनंद यादव, रा.रं. बोराडे, भास्कर चंदनशिव, नागनाथ कोत्तापल्ले, वासुदेव मुलाटे, द.ता. भोसले इत्यादी लेखकांनी चालवलेल्या ग्रामीण साहित्य चळवळीमुळे नवनवीन लेखक लिहिते झाले. नवीन लेखक घडवण्याबरोबर प्रस्तुत लेखकांनी कथा, कविता, कादंबरी, नाट्यलेखनातून ग्रामजीवनाचे वास्तववादी चित्रणही केले.

ग्रामीण लेखकांनी कथा, कविता आणि कादंबरी या वाङ्मयप्रकारात अत्यंत प्रभावी लेखन केले आहे. भास्कर चंदनशिव हे असेच सशक्तपणे कथालेखन करणारे ग्रामीण जीवनाचे भाष्यकार आहेत. संख्यात्मकदृष्ट्या कमी पण गुणात्मकदृष्ट्या अव्वल दर्जाच्या कथा चंदनशिव यांनी लिहिल्या आहेत. जांभुळडव्ह, मरणकळा, अंगारमाती, नवी वारूळं आणि बिरड असे मोजकेच कथा संग्रह चंदनशिव यांच्या नावावर असले तरी समग्र जीवनाचे सारच ते आपल्या कथेतून मांडतात. शेतकरी-शोषित-पीडीत कष्टक-यांच्या जीवनाचे चित्रण, स्त्रियांचे नानाविध प्रश्न व त्यांचे दुःख, गावातील राजकारणात पिळला जाणारा सामान्य नागरिक त्यांच्या कथेत चित्रित झाला आहे.

केवळ ग्रामीणच नव्हे तर दलित जीवनाचेही तेवढेच प्रभावी चित्रण चंदनशिव करतात. त्यामुळेच चंदनशिव यांची कथा दलित-ग्रामीण सीमारेषा पुसट करणारी आहे असे म्हटले जाते. मनोविश्लेषणात्मक कथांबरोबर ग्रामीण कथेला प्रथमच विद्रोह शिकविणारे चंदनशिव यांची कथा गावकुसातील आणि गावकुसाबाहेरी समग्र जीवन कवेत घेते. त्यामुळेच त्यांच्या कथेत गाव एवढे जीवंतपणे येते की सत्यजीत रे यांच्या चित्रपटांची आठवण होते. असे इंद्रजित भालेराव यांना वाटते. एकूणच भास्कर चंदनशिव हे केवळ मराठवाड्यातीलच नव्हे तर भारतीय स्तरावरील महत्त्वाचे लेखक आहेत.

आसाराम लोमटे हे भास्कर चंदनशिव यांच्या कथालेखनाच्या परंपरेतील एकविसाव्या शतकातील सशक्त कथाकार आहेत. चंदनशिव यांच्याप्रमाणेच आसाराम लोमटे यांच्या कथाही संख्यात्मकदृष्ट्या कमी असल्या तरी गुणात्मकदृष्ट्या त्या अव्वल दर्जाच्या आहेत. इडा पिडा टळो, आलोक आणि वाळसरा हे तीन कथासंग्रह आसाराम लोमटे यांच्या नावावर आहेत. त्यांची प्रत्येक कथा ही लघुकादंबरी वाटावी एवढा विस्तृत

पट मांडणारी आहे. ग्रामीण जीवनातील अस्सल अनुभव व बदलत जाणा-या ग्रामजीवनाचा आलेख आसाराम लोमटे आपल्या कथालेखनातून उभा करतात. खेड्यातील शेतकरी, शेतमजूर व स्त्रियांचे दुःख, तेथील लहरी निसर्ग, भ्रष्ट राजकीय-प्रशासकीय व व्यापारी वर्गामुळे पिचला जाणारा शेतकरी व एकूणच बदलत्या गावगाड्याचे व्यापक चित्रण ग्रामीण बोलीसह आसाराम लोमटे करतात.

मराठी ग्रामीण कथा समृद्ध करण्यामध्ये मराठवाड्यातील लेखकांचे भरीव योगदान आहे. मराठवाड्यातील बी. रघुनाथ, रा.रं. बोराडे, भास्कर चंदनशिव, वासुदेव मुलाटे, नागनाथ कोत्तापल्ले, बाबू बिरादार, दारा गोरे, भिमराव वाघचौरे, आसाराम लोमटे, गणेश आवटे, उमेश मोहिते, उत्तम बावस्कर इत्यादी लेखकांनी ग्रामीण कथालेखन केले आहे. मराठवाड्यातील एकूण ग्रामीण कथाकारांपैकी भास्कर चंदनशिव आणि आसाराम लोमटे यांचे लेखन वेगवेगळ्या कालखंडात झाले असले तरी ग्रामजीवनातील वास्तव चित्रित करण्याची त्यांची दृष्टी एकच आहे असे वाटते. दोघेही भारतीय स्तरावरील महत्त्वाचे कथाकार आहेत. त्यामुळे मराठवाड्यातील ग्रामीण कथेचा अभ्यास करत असताना विशेषतः भास्कर चंदनशिव आणि आसाराम लोमटे यांच्या कथेचा विस्तृत आणि एकत्रित अभ्यास करण्याचा प्रस्तुत संशोधकाचा मानस आहे.

संशोधन साहित्याचा आढावा :

मराठवाड्यातील ग्रामीण कथेच्या संदर्भात आजपर्यंत अनेक अभ्यासकांनी, संशोधकांनी लेखन केले आहे. वासुदेव मुलाटे, दादा गोरे, नागनाथ कोत्तापल्ले इत्यादी समीक्षकांनी ग्रामीण कथेच्या संदर्भात विस्तृत लेखन केले आहे. भास्कर चंदनशिव यांच्या कथालेखनावर मथु सावंत, अशोक देशमाने, रमेश जाधव, इंद्रजीत भालेराव इत्यादी अभ्यासकांनी लेखन केले आहे. तर आसाराम लोमटे यांच्या कथालेखनावर म.द. हातकणंगलेकर, भा.ल. भोळे, रंगनाथ पठारे, गणेश मोहिते अशा अनेक अभ्यासकांनी लेखन केले आहे. प्रस्तुत संशोधनामध्ये मराठवाड्यातील ग्रामीण कथा लेखनासंदर्भात

भास्कर चंदनशिव आणि आसाराम लोमटे यांच्या कथेचा एकत्रित अभ्यास करणे अभिप्रेत आहे.

विषय निवडीचा उद्देश :

मराठी ग्रामीण कथा, मराठवाड्यातील ग्रामीण कथा, भास्कर चंदनशिव यांचे कथालेखन तसेच आसाराम लोमटे यांचे कथालेखन या संदर्भात स्वतंत्रपणे आजवर संशोधन झाले आहे. परंतु मराठवाड्यातील एकूण ग्रामीण कथालेखन आणि हे ग्रामीण कथालेखन अधिक व्यापक, समाजसन्मुख करणारे भास्कर चंदनशिव आणि आसाराम लोमटे या दोन कथाकारांचा एकत्रित अभ्यास करण्याचा प्रस्तुत अभ्यासकाचा मानस आहे. मराठवाड्यातील ग्रामीण कथा, भास्कर चंदनशिव यांची कथा आणि आसाराम लोमटे यांची कथा याचा एकमेकांशी अनुबंध जोडण्याच्या उद्देशाने प्रस्तुत संशोधकाने 'मराठवाड्यातील ग्रामीण कथेचा अभ्यास' (भास्कर चंदनशिव आणि आसाराम लोमटे यांच्या विशेष संदर्भात) हा विषय पीएच.डी. संशोधनासाठी निवडला आहे.

संशोधन विषयाचे महत्त्व :

मराठवाड्यातील ग्रामीण कथा आणि मराठी कथेसंदर्भात आजवर विस्तृत संशोधन झाले आहे. प्रस्तुत संशोधनामध्ये मराठवाड्यातील ग्रामीण कथेचे वेगळेपण शोधण्याबरोबर भास्कर चंदनशिव आणि आसाराम लोमटे यांच्या कथेतील वेगळेपणाबरोबर त्यांच्या कथेचा एकमेकांशी असणा-या अनुबंधाचाही अभ्यास अभिप्रेत आहे. एकाच प्रवाहातील व प्रदेशातील वेगवेगळ्या पिढीतील लेखकांच्या लेखनात शोधलेले निराळेपण व जोडलेला अनुबंध यांच्या संदर्भात प्रस्तुत शोध-प्रबंध दिशादर्शक ठरू शकेल.

संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा :

महाराष्ट्रासह इतर राज्यातही मराठी भाषेत ग्रामीण कथालेखन विपूल प्रमाणात झाले आहे. प्रस्तुत संशोधनामध्ये मराठवाड्याच्या आठ जिल्ह्यातील ग्रामीण कथालेखनाचा स्थूल आढावा घेणे तसेच भास्कर चंदनशिव आणि आसाराम लोमटे या दोन ग्रामीण कथाकारांच्या कथालेखनाचा विस्तृत अभ्यास करणे अभिप्रेत आहे. मराठवाड्यातील

कथालेखनाचा स्थूल आढावा घेण्याबरोबर भास्कर चंदनशिव यांच्या पाच कथासंग्रहाचा आणि आसाराम लोमटे यांच्या तीन कथासंग्रहांचा विस्तृत अभ्यास तसेच दोन्ही लेखकांच्या कथाबाह्य लेखनाचा स्थूल अभ्यास करणे ही प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :

१) मराठवाड्यातील ग्रामीण कथालेखनाचा स्थूल अभ्यास करणे.

२) भास्कर चंदनशिव आणि आसाराम लोमटे यांच्या कथालेखनाचा विस्तृत अभ्यास करणे.

३) भास्कर चंदनशिव आणि आसाराम लोमटे यांच्या कथालेखनाचा अनुबंध जोडणे व वेगळेपण सिद्ध करणे.

४) मराठी कथेच्या वाटचालीत भास्कर चंदनशिव आणि आसाराम लोमटे यांचे स्थान स्पष्ट करणे.

५) भास्कर चंदनशिव आणि आसाराम लोमटे यांच्या कथाबाह्य लेखनाचा स्थूल अभ्यास करणे.

संशोधनाची गृहितके :

१) मराठवाड्यातील ग्रामीण कथेने एकूण मराठी ग्रामीण कथा समृद्ध केली आहे.

२) भास्कर चंदनशिव यांची ग्रामीण कथा गावकुसातील जीवनाबरोबर गावकुसाबाहेरील जीवनाचे चित्रण करते.

३) भास्कर चंदनशिव हे पहिले विद्रोही ग्रामीण कथाकार आहे.

४) आसाराम लोमटे यांच्या कथेत बदलत्या ग्रामजीवनाचे चित्रण येते.

५) आसाराम लोमटे यांच्या प्रत्येक कथेचा पट लघुकादंबरीएवढा व्यापक आहे.

संशोधन पद्धती :

'मराठवाड्यातील ग्रामीण कथेचा अभ्यास' (भास्कर चंदनशिव आणि आसाराम लोमटे यांच्या विशेष संदर्भात) या विषयावर संशोधन करत असताना ऐतिहासिक, वर्णनात्मक आणि प्रसंगी तुलनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येईल.

प्रकरणांची रूपरेषा :

प्रस्तुत संशोधन विषयाची एकूण सहा प्रकरणात विभागणी केली आहे. ती खालीलप्रमाणे-

प्रकरण पहिले : मराठवाड्यातील ग्रामीण कथेचे स्वरूप व वाटचाल

प्रस्तुत संशोधनात मराठवाड्यातील ग्रामीण कथालेखनाचा अभ्यास केंद्रस्थानी असला तरी एकूण मराठी ग्रामीण कथेची पार्श्वभूमी अभ्यासने या प्रकरणात अभिप्रेत आहे. मराठी ग्रामीण कथेचा धावता आढावा घेण्याबरोबर मराठवाड्यातील ग्रामीण कथेचे स्वरूप व वाटचाली संदर्भात मांडणी या प्रकरणात करण्यात येईल. मुख्यतः बी. रघुनाथ, रा.रं. बोराडे, नागनाथ कोत्तापल्ले, वासुदेव मुलाटे, बाबू बिरादार, दादा गोरे, गणेश आवटे, भिमराव वाघचौरे, उमेश मोहिते यांसारख्या मराठवाड्यातील ग्रामीण कथाकारांच्या कथालेखनाचे स्वरूप या प्रकरणात स्पष्ट करण्यात येईल.

प्रकरण दुसरे : भास्कर चंदनशिव आणि आसाराम लोमटे : व्यक्तित्व आणि कर्तृत्व

भास्कर चंदनशिव आणि आसाराम लोमटे या दोघांचे व्यक्तिमत्व बहुआयामी स्वरूपाचे आहे. प्रत्यक्ष कथालेखना बरोबर त्यांनी इतर वाङ्‌मयप्रकारातही महत्त्वाचे लेखन केले आहे. त्याचबरोबर वाङ्‌मयीन चळवळीमध्येही त्यांचा सक्रीय सहभाग राहिलेला आहे. या प्रकरणामध्ये भास्कर चंदनशिव आणि आसाराम लोमटे यांचे एकूण व्यक्तित्व आणि त्यांच्या कथाबाह्य वाङ्‌मयप्रकारातील लेखन कर्तृत्वाचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण तिसरे : भास्कर चंदनशिव यांचे कथालेखन

भास्कर चंदनशिव यांचे जांभुळडव्ह, मरणकळा, नवी वारूळं, बिरडं आणि अंगारमाती हे पाच कथासंग्रह प्रकाशित आहेत. प्रस्तुत प्रकरणात या पाचही कथासंग्रहातून चित्रित होणारे ग्रामजीवन, तेथील निसर्ग, त्यांच्या कथेतील स्त्री-पुरूष प्रतिमा व एकूणच भास्कर चंदनशिव यांच्या कथेतील आशयाभिव्यक्तीचे स्वरूप या प्रकरणात अभ्यासले जाईल.

प्रकरण चौथे : आसाराम लोमटे यांचे कथालेखन

आसाराम लोमटे यांचे इडा पिडा टळो, आलोक आणि वाळसरा हे तीन कथासंग्रह प्रकाशित आहेत. प्रस्तुत प्रकरणामध्ये या तीनही कथासंग्रहाचा सखोल अभ्यास करण्यात येईल. आसाराम लोमटे यांच्या कथेतील स्त्री प्रतिमा, ग्रामीणता, कथेचा आकृतीबंध आणि कथेतील आशयविश्वासंदर्भातील मांडणी या प्रकरणात करण्यात येईल.

प्रकरण पाचवे : भास्कर चंदनशिव आणि आसाराम लोमटे यांच्या कथालेखनाचे स्वरूप विशेष, अनुबंध व वेगळेपण

भास्कर चंदनशिव आणि आसाराम लोमटे यांच्या कथालेखनाच्या आधारे त्यांच्या कथेचे स्वरूप विशेष या प्रकरणात मांडण्यात येतील. विशेषतः भास्कर चंदनशिव आणि आसाराम लोमटे यांच्या कथेतील समान सुत्रांच्या आधारे दोन्ही लेखकांच्या लेखनातील अनुबंधाची मांडणी करण्यात येईल. त्याचबरोबर दोन्ही कथाकारांच्या कथालेखनातील वेगळेपणाचा शोधही या प्रकरणात घेण्यात येईल.

प्रकरण सहावे : समारोव व निष्कर्ष

या प्रकरणात उपरोक्त पाच प्रकरणांमध्ये केलेल्या मांडणीचा समारोप करण्यात येईल. त्याचबरोबर एकूण संशोधनाअंती हाती आलेले निष्कर्ष नोंदविण्यात येतील.

संशोधन कार्याचे नियोजन :

प्रस्तुत संशोधन हे सहा प्रकरणात विभागले असून संशोधनाचा किमान कालावधी तीन वर्ष ग्राह्य धरून प्रकरणनिहाय कालावधीचे नियोजन पुढील तक्त्यात दिले आहे.

अ.क्र	संशोधन कार्य	कालावधी
१	प्रकरण पहिले	जुलै २०२३ ते डिसेंबर २०२३
२	प्रकरण दुसरे	जानेवारी २०२४ ते जून २०२४
३	प्रकरण तिसरे	जुलै २०२४ ते डिसेंबर २०२४

४	प्रकरण चौथे	जानेवारी २०२५ ते जून २०२५
५	प्रकरण पाचवे	जुलै २०२५ ते डिसेंबर २०२५
६	प्रकरण सहावे	जानेवारी २०२६ ते जून २०२६

आधारभूत ग्रंथ :

अ) भास्कर चंदनशिव यांचे पाच कथासंग्रह

१) जांभूळडव्ह

२) मरणकळा

३) बिरडं

४) नवी वारूळं

५) अंगारमाती

ब) आसाराम लोमटे यांचे तीन कथासंग्रह

१) इडा पिडा टळो

२) आलोक

३) वाळसरा

संदर्भ ग्रंथ :

१) यादव आनंद, ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या

२) कोत्तापल्ले नागनाथ, साहित्याचा अन्वयार्थ

३) नलगे चंद्रकुमार, ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास

४) मुलाटे वासुदेव, ग्रामीण कथा : स्वरूप आणि विकास

५) मुलाटे वासुदेव (संपा.), मराठवाड्याची कथा

६) लुलेकर प्रल्हाद, मराठवाड्यातील साहित्य

७) सावंत मथु, कथाकार भास्कर चदंनशिव

८) हातकणंगलेकर म.द., मराठी कथा : रूप आणि स्वरूप

९) भालेराव इंद्रजित (संपा.), लाल चिखल

१०) भालेराव इंद्रजित, म-हाटवाडी

संशोधक

आयोध्या आश्रुबा काटे

मार्गदर्शक

प्रा.डॉ. विश्वाधार रामराव देशमुख

मराठी विभाग,

यशवंत महाविद्यालय, नांदेड